सत्यमेव जयते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/पुणे योजना/२०२४-२५/ ४८६६ दि.२७/०९/२०२४

महत्त्वाची सूचना

स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ संदर्भात लाभार्थी निवडीकरिता घेण्यात आलेल्या सामायिक प्रवेश परीक्षांमध्ये (CETs) प्राप्त झालेले गुण पाहण्याची सोय उपलब्ध करून देणेबाबत

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वंकष धोरणांतर्गत घेण्यात आलेल्या सामायिक प्रवेश परीक्षांना उपस्थित असलेल्या **अनुसूचित जातीच्या उमेदवारांचे** सदर परीक्षांमध्ये प्राप्त झालेले गुण पाहण्याकरिता Online Result Web Copy ची सुविधा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर संबंधित लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उमेदवाराने त्यांचा अर्ज क्रमांक Application No. (Admit Card मध्ये नमूद केल्याप्रमाणे) आणि पासवर्ड (Admit Card मध्ये नमूद केल्याप्रमाणे) किंवा जन्मदिनांक (DD-MM-YYYY स्वरूपात Admit Card मध्ये नमूद केल्याप्रमाणे) वापरणे आवश्यक आहे. सदर सुविधा **दि. २७/०९/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपासून दिनांक ०२/१०/२०२४ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत** उपलब्ध राहील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी.
(सुनिल वारे)
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.